डी. एच. क्षीरसागर



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

## Special Issue

Sarvoday Shikshan Sanstha's

## Arts, Commerce and Science College, Kowad.

Tal. Chandgad, Dist. Kolhapur (Maharashtra) – 416508

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Re-accredited by NAAC 'B+'

Email : kowad2.cl@unishivaji.ac.in Web : www.acscollegekowad.com

One day National Online Webinar on

## Dr. Babasaheb Ambedkar's Human Rights, Socio-Economic and Political Thoughts

Date : 10/04/2022, Day : Sunday

Organized by NSS and Sociology Department under the aegis of IQAC.

**Dr. Khanderavaji S. Kale**
Cordinator

**Dr. V. K. Dalvi**
Co- coordinator

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

41) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार
**डॉ. के. पी. वाघमारे, जि– कोल्हापूर** ||179

42) DR. B R Ambedkar - Bulwark of women emancipation in India
**Mr. Akash Tawar, Bilaspur, Chhattisgarh, India** ||182

43) स्त्रीमुक्ती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव, नेसरी** ||187

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगारांबद्दलचे कार्य
**कांबळे प्रशांत प्रकाश, गडहिंग्लज** ||190

45) बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
**कु. प्रतिभा पुंडलिक दुंडगे, गडहिंग्लज** ||193

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जलसंस्कृती जोपासना
**डॉ. जगदीश दिनकर शेवते, नसरापूर** ||195

47) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील चळवळी
**प्रा. पराग मुरलीधर सपाटे, जि. नागपूर** ||198

48) महार रेजिमेंटच्या स्थापनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : एक ...
**डॉ. जान्हवी सुबोध थोरात, मुंबई** ||202

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
**नम्रता पंडीतराव म्हस्के, औरंगाबाद** ||207

50) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार
**कु. योगिता पांडुरंग डावरे, गडहिंग्लज** ||209

51) महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाची तुलना
**सहा. प्रा. डी. एस. क्षीरसागर, जि. कोल्हापूर** ||213

52) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन
**डॉ. डी. जी. चिघळीकर, गडहिंग्लज** ||217

53) धार्मिक चेतना के पक्षधर डॉ– आंबेडकर: 'अपने–अपने पिंजरे' के संदर्भ में
**प्रा.डॉ अजयकुमार कृष्णा कांबळे, जि.कोल्हापुर, महाराष्ट्र** ||223

54) Dr. B.R. Ambedkar's Contribution to Nation Building
**Dr. A. S. Arbole, Kowad** ||227

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

**51**

# महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाची तुलना

**सहा. प्रा. डी. एस. क्षीरसागर**
ए. सी. एस. कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**गोषवारा**

सदर संशोधन लेखामध्ये सामाजिक न्याय ही संकल्पना मध्यवर्ती मानून, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्याय संकल्पनेचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. सदर विश्लेषण जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता या परिप्रेक्षात केले असून, याबाबत दोहोंचे या समस्येप्रतीचे आकलन आणि उपाय नमूद केले आहे. सुरुवातीस लेखाचा उद्देश स्पष्ट केला आहे. त्यानंतर सामाजिक न्याय संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला आहे. पुढे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय या क्षेत्रानुसार महात्मा गांधी यांच्या सामाजिक न्याय संकल्पनेची मांडणी केली आहे. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय या क्षेत्रानुसार वर्गीकृत करून सामाजिक न्याय संकल्पनेची मांडणी केली आहे. पुढील भागात दोन्ही विचारवंताच्या सामाजिक न्याय संकल्पनेसंदर्भात सहमती आणि असहमतीची स्थळे तुलनात्मक पद्धतीने नमूद केले आहेत. भारतात जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता याविरोधात महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिक्रिया दिली. याबाबत दोघांचे अंतिम ध्येय एक होते केवळ समस्याविषयीचे आकलन आणि त्यांच्या सोडवणुकीचे दृष्टीकोन यामध्ये फरक आहे. दोघांनीही अशा आदर्श भारतीय समाजाची कल्पना केली, ज्यामध्ये लाभ आणि विशेष अधिकारावर केवळ एका समाज घटकाची एकाधिकारशाही न राहता सर्वांना त्याचा वाटा मिळेल आणि समता आणि न्याय तत्वावर आधारित समतावादी समाजाची प्रस्थापना होईल. जर समाजातील एखादा गट समाजाच्या अंगभूत रचनात्मक विषमतेमुळे नुकसान सहन करत असेल तर अशी रचनात्मक विषमता काढून टाकण्यासाठी विशेष काळजी घेतली जाईल.

**सामाजिक न्याय:** समाजातील भेदभाव आणि वंचिततेचे बळी ठरलेल्यासाठी राज्य कल्याणकारी कायदे अधिनियमित करते. एकूणच कल्याणकारी राज्याची कृती म्हणजे सामाजिक न्याय होय. असा सामाजिक न्यायाचा अर्थ येथे अभिप्रेत धरला आहे.

**निष्कर्ष:** गांधी आणि आंबेडकर दोघांचा सामाजिक न्यायावर विस्वास होता. समता आणि विवेकावर आधारित समतावादी समाज स्थापन करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. दोघांचाही यावर विस्वास होता कि, ब्रिटीशांकडून स्वातंर्त्य मिळवून स्वातंर्त्य चळवळीचा शेवट केवळ होणार नाही तर सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील विषमता आणि अस्पृश्यता या हानिकारक गोष्टीपासून मुक्त अशा समाजाची स्थापना केल्याने होणार आहे. समाजातील दुर्बल घटकांची विशेषत: जे भेदभावाचे बळी ठरलेले आहेत अशांची विशेष काळजी घेतली पाहिजे यावर दोघांचा विश्वास होता.

परंतु, त्यांचे आदर्श समाजाचे स्वप्न आणि ते प्राप्त करण्याचे स्वत:चे दृष्टीकोन होते. सामाजिक क्षेत्रात गांधीनी वर्ण व्यवस्थेचे समर्थन केले आहे. आंबेडकरांनी याला विरोध केला होता. असा विचार मांडला कि जर समाजव्यवस्था जन्माशी जोडली असेल तर, व्यक्तीचा व्यवसाय आणि दर्जा गुणवत्तेच्या आधारे नाही तर वंशपरंपरेच्या आधारे ठरवला जाईल आणि व्यवस्था निकृष्ठ अवस्थेला जाईल. आर्थिक क्षेत्रात गांधीनी विकेंद्रित अर्थव्यवस्थेचे समर्थन केले आणि विस्वताचा सिद्धांत मांडला. ज्यामध्ये श्रीमंत व्यक्ती आपल्या गरजेपुरत्या संपतीचा वापर करेल आणी उर्वरित संपतीचा वापर विश्वत म्हणून गरजवंतांसाठी करेल. दुसऱ्या बाजूने डॉ.

जुलुमाचे बळी ठरले. समता आणि बंधुत्वाच्या आधारावर समाजाचे संघटन करावयाचे असेल तर जाती व्यवस्था गेलीच पाहिजे. जातीचा विकास होत गेला आणि ज्यातून समतेच्या विरुद्ध असणारी दर्जाची विषमता जन्माला आली. जातीव्येव्स्थेच्या विकासाबरोबर न्याय सामाज व्यवस्थेची आवश्यकता संपूष्टात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते जात आणि अस्पृश्यतेचे घनिष्ट नाते आहे. त्यामुळे एक नष्ट केल्याशिवाय दुसरे नष्ट होणे अशक्य आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जाती व्यवस्था नष्ट करून समता आणि न्यायावर आधारित समाज निर्माण करण्याच्या विचाराचे होते. ज्यामुळे सामाजिक न्यायाची प्रस्तापना होईल.

डॉ. आंबेडकरानी समाजातील दुर्बल घटकाचे आर्थिक हित जोपासण्यासाठी राज्याच्या भूमिकेला महत्वाचे मानले. त्यांनी 'स्टेट अंड मायनोरीटी' या ग्रंथात विस्तृत विवेचन केले आहे. मुख्य उद्योग किंवा राज्याद्वारे स्थापन निगम राज्याच्या मालकीचे आणि राज्याकडून चालवले गेले पाहिजेत, विमा क्षेतात राज्याचे अधिपत्य असले पाहिजे आणि कृषी हा राज्याचा उद्योग असला पाहिजे. (मून वसंत, २०१९, ३९६—३९७) संपत्तीचे न्याय वितरण करण्यासाठी व्यक्तीच्या आर्थिक जीवनाचे नियोजन राज्याकडे असली पाहिजे. ते कायदेमंडलाच्या इच्छेवर सोडून न देता संविधानात्मक कायद्यात विहित असले पाहिजे.

डॉ. आंबेडकरानी दुर्बल घटकाच्या कल्याणासाठी केंद्रीकृत राज्यव्यवस्थेची आवश्यकता व्यक्त केली. शक्तिशाली केंद्र असलेल्या संघराज्य व्येवस्थेचे समर्थन केले. देशाचे शासन मोजक्या व्यक्तीचा अथवा समाजातील एखाद्या विशिष्ठ घटकाचा विशेषाधिकार असता कामा नये. प्रत्येक समाज घटक त्यात सामील व्हावा यासाठी प्रौढ माताधीकाराचा मार्ग सांगितला. दुर्बल घटकांच्या प्रतिनिधित्वाच्या शाश्वातीसाठी त्यांनी राखीव जागांसह संयुक्त मतदार संघाची सूचना केली. वंचित वर्गाची समस्या केवळ सामाजिक नसून ती राजकीय समस्या सुद्धा आहे. त्यांची समस्या सोडवण्यासाठी त्यांना राजकीय सत्तेचा वाटा मिळालाच पाहिजे. आम्हाला वाटत, आमच्याप्रमाणे आमचे गाऱ्हाणे कोणीही दूर करू शकत नाही. जर आमच्या हातात राजकीय सत्ता आली नाही तर आम्हीही दूर करू शकणार नाहीत. स्वराज्याच्या संविधानात आपणास राजकीय सत्ता हस्तगत करण्याची संधी आहे. याशिवाय आपण आपल्या लोकांची मुक्ती करू शकत नाही. (शेलेन्द्रकुमार तिवारी, २००९)

डॉ. आंबेडकरांनी भारताच्या समाजाच्या अंगभूत रचनेत असलेल्या रचनात्मक विषमतेने ग्रासल्यामुळे बचावात्मक भेदभावाचा पुरस्कार केला. त्यामुळे सामाजिक न्यायावर आधारित समाजाचे पुनरसंघटन करणे आवश्यक आहे असा विचार त्यांनी मांडला.

**संदर्भ:**

१. गांधी, एम. के. (६ ऑक्टो.१९२१). यंग इंडिया. हिंदुझम

२. प्रसाद, विमल. (१९८५). गांधी, नेहरू अंड जे. पी. :स्टडीज इन लीडरशिप. दिल्ली, चाणक्य पब्लिकेशन. पान. ४५—४६

३. गांधी, एम. के., (१९६०), इंडिया ऑफ माय ड्रीम्स, अहमदाबाद, नवजीवन मुद्रणालय. पान. १६

४. मून, वसंत. (२०१९). डॉ. बाबासाहेब आंबेडकर: रायटिंग एंड स्पीचेस. नवी दिल्ली, अवस—१, डॉ. आंबेडकर फौन्डेशन. पान— १७—१८

५. तिवारी, एस. के. (२००९) सोशल जस्टीस: गांधी एंड आंबेडकर. दी इंडियन जर्नल ऑफ पोलीटीकल सायन्स. स्ग (२), ४२९—४३९.

६. मून, वसंत. (२०१९). डॉ. बाबासाहेब आंबेडकर: रायटिंग एंड स्पीचेस. नवी दिल्ली, अवस—१, डॉ. आंबेडकर फौन्डेशन. पान— ३९६—३९७

⌘⌘⌘